# पाच केंद्रप्रमुखांनी शासनाची दिशाभूल करून २०२१ व २०२२ चे बोगस थकीत वेतन उचलले?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564






■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २२२ ■ बुधवार दि.३० एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 222 ■ Wednesday Dt.30 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# धारूर गटशिक्षणाधिकारी कार्यालय अंतर्गत असलेल्या पाच केंद्रप्रमुखांचा थकीत वेतनाचा घोटाळा चव्हाट्यावर!

## संबंधित केंद्रप्रमुख हे बोगस केंद्रप्रमुख असून, आर्थिक तडजोडीतून वरिष्ठ कार्यालयातील अधिकाऱ्यांना हाताशी धरून मिळवले केंद्रप्रमुख पद?

- केंद्रप्रमुखांनी उचललेल्या थकीत वेतन घोटाळ्याची चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी!
- शासनाची दिशाभूल करून केलेल्या घोटाळ्याची सखोल चौकशी करून दोशी असणाऱ्यांवर ४२० प्रमाणे कायदेशीर कारवाई होणे गरजेचे?
- केंद्रप्रमुखांच्या थकीत वेतन घोटाळ्याप्रकरणी जिल्हा परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण; उपोषणाचा आजचा पहिला दिवस!
- पाचही केंद्रप्रमुखांच्या घोटाळ्याप्रकरणी सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ आवाज उठवणार!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील धारूर गटशिक्षणाधिकारी कार्यालय अंतर्गत कार्यरत असलेल्या पाच केंद्रप्रमुखांच्या थकीत वेतना घोटाळ्याप्रकरणी जिल्हा परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण चालू आहे. तसेच या घोटाळ्याची चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी उपोषणकर्ते सचिन गायसमुद्रे यांची मागणी आहे. संबंधित या पाच केंद्रप्रमुखांनी सन २०२१ व २०२२ मध्ये शासनाची फसवणूक करून दोन वेळेस थकीत वेतन उचललेले आहेत. सदरील केंद्रप्रमुख हे बोगस केंद्रप्रमुख असून पैसे देऊन त्यांनी वरिष्ठ कार्यालयातील अधिकाऱ्यांना हाताशी धरून केंद्रप्रमुख पद मिळवलेले असून थकीत वेतन देखील उचललेले असल्याचे उपोषणकर्त्यांकडून सांगितले जात आहे.

धारूर गटशिक्षणाधिकारी कार्यालयांतर्गत असलेले शिक्षक दत्तात्रय कोकाणे, रामहरी गांधले, गंगाधर शिंदे व व्यंकटेश गडदे तसेच सय्यद हकीम या पाच केंद्रप्रमुखांनी २०२१ व २०२२ मध्ये शासनाची फसवणूक करून दोन वेळेस थकीत वेतन उचललेले आहेत. या घोटाळ्याप्रकरणी बीडच्या जिल्हा परिषद कार्यालयासमोर सचिन गायसमुद्रे हे आमरण उपोषणाला बसलेले आहेत. तसेच या पाच केंद्रप्रमुख बोगस केंद्रप्रमुख असून त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना हाताशी धरून तसेच संगणमत करून थकीत वेतन उचललेले असल्याचे आरोप उपोषणकर्ते सचिन गायसमुद्रे यांनी केला आहे. त्यामुळे या बोगस केंद्रप्रमुखांनी उचललेले २०२१ व २०२२ मधील थकीत वेतन हे त्यांच्याकडून वसूल करून घेऊन शासन खाती जमा करण्याचे आदेश देण्यात यावे अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.

तसेच संबंधित केंद्रप्रमुख हे पदोन्नतीने केंद्रप्रमुख झालेले आहेत. परंतु पात्र शिक्षकांना डावलून त्यांना केंद्रप्रमुख पदी पदोन्नती देण्यात आलेली आहे. व पदोन्नती मिळाल्यापासूनचे सन २०२१ व २०२२ चे दोन वेळेस चे थकीत वेतन उचललेले आहे. तरी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी व संबंधित या पाच केंद्रप्रमुखांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे. संबंधित केंद्रप्रमुख असलेले दत्तात्रय कोकाणे, रामहरी गांधले, गंगाधर शिंदे व व्यंकटेश गडदे तसेच सय्यद हकीम यांनी २०२१ व २०२२ मध्ये शासनाची फसवणूक करून दोन वेळेस थकीत वेतन उचललेले आहेत. शासनाची दिशाभूल करून झालेल्या घोटाळ्याची सखोल चौकशी करून दोषी असणाऱ्यांवर कलम ४२० प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात यावी यासाठी यापूर्वी देखील निवेदन दिलेले होते परंतु यावर काही कारवाई झालेली नाही. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज जिल्हा परिषद येथे आमरण उपोषण चालू आहे. तरी याप्रकरणी वरिष्ठ अधिकारी तातडीने लक्ष घालून सदरील घोटाळा बाहेर काढून कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.



## प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे उपोषण तात्पुरते स्थगित

### डॉ.योगेश क्षीरसागरांची मध्यस्थी; ना.अजितदादांसमोर प्रश्न मांडण्याची ग्वाही

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक पदवीधर, भाषा व सामाजिक शास्त्र विषयाच्या ७४ शिक्षकांनी गणित व विज्ञान विषयांत रूपांतर करण्याच्या मागणीसह इतर विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू होते. उपोषणस्थळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२९) भेट देत शिक्षकांशी संवाद साधला. त्यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.



डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले की, शिक्षकांच्या मागण्या न्याय्य असून त्या शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या जातील. उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यामार्फत शासनदरबारी पाठपुरावा करून या मागण्यांची योग्य ती दखल घेण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून शिक्षकांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यावर लवकरात लवकर तोडगा काढण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीला प्रतिसाद देत, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांच्याद्वारे शिक्षकांना निरोप पाठवला आणि त्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. या भेटीदरम्यान आनंद पिंगळे, सुमंत खांडे, विजय खोसे, सुमेध जोगदंड, दिपक घाटे, विकास गवते, दिलीपकुमार सानप, जितेंद्र सांगळे, निलेश चव्हाण यांच्यासह शिक्षक बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, शिक्षकांनी आपल्या मागण्यांकडे शासनाने तत्काळ लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## बीडचा युवक नाशिकच्या रामकुंडात वाहून गेला

बीड । प्रतिनिधी

नाशिकच्या पवित्र रामकुंडावर गेलेल्या एका तरुणाचा पाय घसरल्याने तो क्षणार्धात गोदावरीत वाहून गेल्याची घटना समोर आली. बीड जिल्ह्यातील हा तरुण पाय घसरून थेट गोदावरी नदीत पडला आणि क्षणातच नदीच्या जोरदार प्रवाहात वाहून गेलाय. गोदावरी नदीच्या पात्रात सध्या तब्बल १ हजार क्युसेक वेगाने विसर्ग सुरू आहे. हा तरुण गोदावरीत पडल्याने वाहून गेला असून, अद्याप त्याचा थांगपत्ता लागलेला नाही.

गोदावरी पात्रात सध्या मोठ्या प्रमाणात पानवेलींचे जाळं तयार झालं असून, त्या पानवेलीत हा तरुण अडकलेला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गउइ च्या सहाय्याने नदीतून पानवेली हटवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. प्रशासनाकडून शोधमोहीम सुरु करण्यात आली असून, प्रवाहातील प्रत्येक संभाव्य भागाची तपासणी केली जात आहे. श्राद्धपक्षामुळे रामकुंड परिसरात मोठी वर्दळ असतानाच ही दुर्घटना घडल्याने परिसरात भीतीचं आणि चिंतेचं वातावरण आहे.

नाशिकच्या पवित्र रामकुंडावर गेलेल्या तरुणाचा पाय घसरून तो गोदावरी नदीत वाहून गेला. गोदावरी पात्रात सध्या १ हजार क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे प्रवाह तीव्र असल्याने तरुण क्षणार्धात वाहून गेला. ही घटना घडल्यानंतर प्रशासन व स्थानिक आपत्कालीन


पान २ वर





# ‘जिओ’च्या समस्येमुळे नेकनूरकर हैराण



## भरीव शुल्क आकारूनही मिळेना मोबाईलधारकांना सेवा

नेकनूर । प्रतिनिधी

हॅलो.. हॅलो रेंज नाही.. ऐकायला येत नाही थांबा पुन्हा कॉल करतो ’मोबाईलवर कॉल केल्यानंतर मोबाईलधारकांकडून अशी संभाषणे कानांवर पडत आहेत. गेल्या काही दिवसांपासून जीओच्या नेटवर्क कंपनीच्या मोबाईल नेटवर्कचा फज्जा उडाल्याने ग्राहक वैतागले आहेत. वाढीव दराच्या प्रमाणात मोबाईल कंपन्यांकडून सेवा मिळत नसल्याने ग्राहकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत. प्रत्येक रविवारी नेकनूरमधील नेकवर्क गुल होत असल्याने येथील मोबाईल धारक हैराण असून अव्वाच्या सव्वा पैसे आकारून मोबाईल धारकांना सेवा मिळत नाहीत.

दैनंदिन गरजांच्या प्रमुख यादीत आता मोबाईलने स्थान मिळविले आहे मोबाईल कंपन्यांच्या दराच्या स्पर्धेत कॉलिंग मागे पडून नेटपॅकची स्पर्धा आली कधी काळी इनकमिंगला पैसे आकारणारी मोबाईल सेवा अक्षरश: मोफत झाली. त्यामुळे उठता बसता मोबाईलवरून कॉल करण्याची एकप्रकारे सवयच जडली या सवयीला गेल्या काही दिवसांपासून खो बसु लागल्याने मोबाईलधारकांच्या डोकेदुखीत वाढ झाली आहे. मोबाईलला नेटवर्कची साथ मिळत नसल्याने स्मार्ट फोनचा डब्बा फोन झाला आहे गेल्या काही दिवसांपासून ही समस्या सुरू झाली असल्याचे जिओ कंपनी च्या ग्राहकांकडून सांगण्यात येत आहे अनेक मोबाईल कंपन्यांचे मर्जिंग सरू आहे एकमेकांच्या टॉवरना जोडण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे नेटवर्कमध्ये अडचण येत असल्याचे कंपन्याकडून ग्राहकांना सांगण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून अचानक मोबाईलचे नेटवर्क गायब होत आहे इंटरनेट सेवा ही विस्कळीत होते. मोबाईलला नेटवर्कच नसल्याने अनेक वेळा फोनच लागत नाहीत, लागला तरी ऐकायला येत नाही. फोन मध्येच अचानक बंद होत आहे तसेच फोन सुरू असूनही एकमेकांचा आवाज व्यवस्थित ऐकू येत नाही. मोबाईलमध्ये फुल नेटवर्क दाखवत असतानादेखील प्रत्यक्षात मात्र फोन लागत नाही नेटवर्कच्या संबंधित अशा असंख्य समस्यांनी ग्राहक हैराण झाले आहेत.

**मोबाईल इंटरनेटही विस्कळीत...**

सध्या मोबाईल फोन केवळ फोन करण्यापुरताच मर्यादित राहिला नाही. मोबाईल इंटरनेट वापर, करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे इंटरनेटच्या माध्यमातून केवळ करमणुकच नव्हे, तर व्यवसाय व कार्यालयीन कामेही आणि विध्यार्थ्यांचा ऑनलाईन अभ्यास आता मोबाईल वरच केला जात आहे. मात्र नेटवर्कच्या समस्येमुळे काही प्रमाणात अशा सेवांवरही परिणाम झाला आहे. इंटरनेट सेवेचा वेग कमी झाल्याच्या ग्राहकांकडून तक्रारी करण्यात येत आहेत. महागडे रिचार्ज केले तरी खराब नेटवर्क आणि लो स्पीड इंटरनेटमुळे ग्राहकांकडून संताप व्यक्त करण्यात येत असून नेटवर्क सेवा सुधारण्याची मागणी ग्राहकांकडून होत आहे.

**जनरेटर दिखाव्याला**

ग्रामीण भागात लाईट सारखे ये जा करत असते, कधी कधी तर दिवस दिवस लाईट येत नाही त्यामुळे ग्रामीण भागातील टॉवर वरील नेटवर्क गायब होत आहे येथील असणारे जनरेटर केवळ दिखाव्या पुरतेच असून एक दोन तास जरी लाईट गेली की नेकनूरमधील नेटवर्क गुल होत आहे.

# पदवीधर शिक्षकांचे बेमुदत उपोषण आठ दिवसाकरता स्थगित

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद मध्ये प्राथमिक पदवीधर पदावर कार्यरत असलेल्या भाषा व सामाजिक शास्त्र विषयाच्या ७४ प्राथमिक पदवीधर शिक्षकांनी गणित व विज्ञान विषयांमध्ये रूपांतरण करण्यात यावे या मागणीसाठी आज दिनांक २८ /४/ २०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर बेमुदत उपोषण सुरू केले होते. संबंधित शिक्षक हे गेल्या आठ महिन्यापासून गणित /विज्ञान विषयात समावेश करावा म्हणून जिल्हा परिषद बीड कडे मागणी करत आहेत. बीड जिल्हा परिषद मध्ये भाषा व सामाजिक शास्त्र विषयाचे शिक्षक अतिरिक्त असून गणित व विज्ञान विषयाच्या जवळपास ४०० जागा शिल्लक आहेत .त्यामुळे गणित व विज्ञान या विषयासाठी शिक्षक उपलब्ध



व्हावेत व अतिरिक्त शिक्षकाचे प्रमाण कमी व्हावे या हेतूने शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार संबंधित शिक्षकांनी ही मागणी केली आहे. महाराष्ट्रातील सातारा, जालना, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर यासारखे इतर जिल्हा परिषद ने गणित /विज्ञान विषयामधे रूपांतरण प्रकिया स्वतः हून करून दिलेली असताना बीड जिल्हा परिषद ने मात्र या विषयी दप्तर दिरंगाईचे धोरण आखलेले आहे.

या विषय रूपांतरण मुळे २०२५ च्या बदली प्रक्रियेमध्ये कसलेही प्रकारे शासकीय नियमाचे उल्लंघन होत नसून जे शिक्षक बदली पात्र आहेत त्यांची शंभर टक्के बदली होणारच आहे .तसेच शासनावरती कसल्याही प्रकारे आर्थिक भार या प्रक्रियेमुळे पडणार नसून कोणालाही वेतन फरक दिला जाणार नाही. तरीही जिल्हा परिषद बीड ने गेल्या आठ महिन्यापासून माननीय शिक्षण संचालक पुणे यांनी विषय बदल करता येईल असे मार्गदर्शन केलेले असतानाही हा प्रश्न प्रलंबित ठेवलेला आहे. आठ महिन्यापासून हा प्रश्न न सोडवल्यामुळे संबंधित शिक्षकांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केली असता माननीय उच्च न्यायालयाने दिनांक ०३/०४/ २०२५ रोजी झालेल्या सुनावणीत दोन आठवड्यात जिल्हा परिषद प्रशासनाने हा विषय बदल करून देण्याबाबत आदेश दिलेले आहे .तरी देखील जिल्हा परिषद प्रशासनाने या आदेशाकडे सविस्तर दुर्लक्ष केल्यामुळे संबंधित शिक्षक हे दिनांक २८/ ४/ २०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर उपोषणास बसलेले होते. माननीय भगवान फुलारी शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद बीड यांनी या विषयाची दखल घेऊन संबंधित विषय रूपांतरणाचा प्रश्न आठ दिवसात माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांच्या आदेशान्वये सोडवला जाईल असे आश्वासन दिनांक २९/०४/२०२५ रोजी सायंकाळी सात वाजता उपोषणस्थळी उपोषणकर्ते शिक्षकांना दिल्यानंतर बीड जिल्ह्यातील बीएससी पदवी उत्तीर्ण असलेल्या प्राथमिक पदवीधर शिक्षकांच्या वतीने सुरू असलेले बेमुदत उपोषण आठ दिवसा करता स्थगित करण्यात आले आहे अशी माहिती मिळाली आहे.

# समाजवादी पक्ष बीड जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक पूर्ण ताकदीने लढणार

बीड । प्रतिनिधी

समाजवादी पक्षाने देशात नेहमी संविधान आणि लोकतंत्र्याचे रक्षण करण्याचे काम केले आहे. जातीवादी धाराला रोखण्याकरिता समाजवादी पक्षाचे हात मजबूत करण्याचे आवाहन समाजवादी पक्षाचे प्रदेश महासचिव डॉक्टर अब्दुल रौफ यांनी केले तर समाजवादी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष यांनी बीड जिल्हा समाजवादी पक्षाचे कार्य दखल घेण्यासारखे असून जिल्हा अध्यक्ष या नात्याने खमरूल इमान यांनी पक्षासाठी महत्त्वाचे काम केले आहे त्यांचे काम गौरवस्पद असून समाजवादी पक्ष बीड जिल्ह्यात की स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक म्हणजे नगरपरिषद जिल्हा परिषद पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणूक पूर्ण ताकदीने लढण्याची घोषणा करून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक करिता समाजवादी पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी समाजवादी पक्ष जिल्हा कार्यालय बीड या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली जिल्हा आढावा बैठकीत केले. यावेळी समाजवादी पक्ष युवा आघाडीचे प्रदेश अध्यक्ष रुचकर समाजवादी पक्ष प्रदेश सचिव एडवोकेट शिवाजी कांबळे महिला आघाडीची जिल्हा अध्यक्ष साले हा जिलानी व इतर उपस्थित होते.

यावेळी समाजाची पक्षाचे जिल्हाध्यक्ष



खमरूल इमान यांनी बीड जिल्हा समाजवादी कडून गेल्या एक वर्षात करण्यात आलेले कामाचा आढावा प्रदेश कार्यकारणी समोर सादर केले आणि यावेळी प्रदेश कार्यकारिणी यांचे उपस्थितीत नवीन पद अधिकारी यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांच्या समाजवादी पक्षात प्रवेश घेण्यात आला यावेळी समाजवादी पक्ष युवा आघाडीच्या जिल्हा अध्यक्षपदी पठाण मुनीबखान अब्दुल गफ्फार खान यांची निवड करण्यात आली तर समाजवादी पक्षाचे बीड जिल्हा महासचिव पदी मोमीन मोहम्मद साद अब्दुल रजाक यांची निवड करण्यात आली युवा आघाडीचे बीड शहर अध्यक्षपदी मोहम्मद ऐहतेशाम यांची निवड करण्यात आली आहे तर बीड जिल्हा समाजवादीचे महासचिव पदी मिर्झा एहसान बॅग यांची निवड करण्यात आली आहे.

बीड जिल्हा संघटक म्हणून अब्दुल रज्जाक मोहम्मद युनूस यांची निवड करण्यात आली तर बीड शहर अध्यक्षपदी उमेश निवृत्ती वडमारे यांची नियुक्ती करण्यात आली. बीड शहर उपाध्यक्षपदी सय्यद इरफान सय्यद रहमान यांची नियुक्ती करण्यात आली तर बीड तालुका उपाध्यक्षपदी सुधीर सिकंदर वंजारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे दुसरीकडे बीड तालुका महिला अध्यक्षपदी हिना शमशदिन शेख यांची निवड करण्यात आली तर समाजवादी पक्षाचे बीड तालुका सचिव म्हणून खाजा लतीफ शेख पाशा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बीड तालुका संघटक म्हणून शेख हमीद शेख रहीम यांची नियुक्ती करण्यात आली तर बीड शहर संघटक म्हणून जमीर अमीर शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासोबतच समाजवादी पक्षाचे धारूर तालुका अध्यक्ष म्हणून जावेद आश्रम शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे तर गेवराई तालुका अध्यक्ष म्हणून खाजा शेख बाबू यांची नियुक्ती करण्यात आली आहे यासोबतच गेवराई तालुका महासचिव पदी जमादार शेर खान पठाण यांची नियुक्ती करण्यात आली तर बीड शहर महासचिव म्हणून असलम जाफर मणियार यांची नियुक्ती करण्यात आली आहे माजलगावचे तालुका उपाध्यक्षपदी शेख वजीर यांची निवड करण्यात आली व माजलगाव शहर अध्यक्षपदी गुलाब जिलानी पठाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या बैठकीत झालेले नियुक्तीवर राज्य कार्यकारिणीने बीड जिल्हा समाजवादी पक्षाचे कार्याला गौरवास्पद म्हणून संबोधित केले बीड जिल्हा समाजवादी पक्षाला राज्य कार्यकारणी कडून पूर्ण सहकार्य करण्यात येईल होणारे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक बाबत बीड जिल्हा समाजवादी पक्षाने पूर्ण ताकदीने कामाला लागावे अशी सूचना राज्य कार्यकारणी कडून देण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात समाजवादी पर्वाची सुरुवात झाली असून लवकरच बीड जिल्ह्यातील सर्व तालुके शहर व गाव पातळीवर पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे आश्वासन यावेळी जिल्हाध्यक्ष कमरुल विमान यांनी राज्य कार्यकारणीला दिले आहे या बैठकीत मोठी संख्येने समाजवादी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. ज्यावेळी इतर मुद्द्याबाबत ही घेण्यात आले या बैठकीचे सूत्रसंचालन जिल्हा अध्यक्ष यांनी केले तर आभार प्रदेशाची शिवाजी कांबळे यांनी व्यक्त केले.

# १ मे च्या कामगार कर्मचारी शेतकरी मिरवणुकीत सहभागी व्हा - प्रा.मोराळे

बीड । प्रतिनिधी

दिवसेंदिवस कामगार कर्मचारी शिक्षक शेतकरी वंचित उपेक्षित वर्गाचे प्रश्न जटिल होत आहेत गेल्या तीन महिन्यात मराठवाड्यात २५९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत शिक्षण क्षेत्रात रोज नवा जीआर काढून राज्यकर्त्यांनी गोंधळ निर्माण केला आहे. शेतकरी कर्ज माफ करतो म्हणून खोटी आश्वासने देऊन सरकार राज्यात आले मात्र आता शेतकरी कर्ज माफ करता येणार नाही असे जाहीर करून टाकले. लाडकी बहीण योजना गुंडाळण्याची तयारी सुरू आहे जवळपास दहा लाख लाडक्या बहिणींना या ना त्या कारणामुळे लाभ नाकारला आहे कामगार म्हणून मान्यता मिळण्यासाठी ग्रामसेवकांचा दाखला मिळत नाही.५२००० शिपाई प्रवर्गाची पदे व्यापगत केली आहेत. नौकऱ्यांचे कंत्राटीकरण सुरू आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास सरकार टाळा-टाळ करत आहे. संघटित शक्ती दाखवून सरकारला वटणीवर आणण्यासाठी सर्व क्षेत्रातील कामगार कर्मचारी शेतकरी कष्टकऱ्यांनी दिनांक १ मे जागतिक कामगार दिनाच्या मिरवणुकीत सहभागी व्हावे असे आव्हान किसान संघर्ष समितीच्या प्रा सुशिलाताई मोराळे यांनी केले आहे. सरकारने जन सुरक्षा कायदा पारित केला आहे हा कायदा लोकशाही मूल्यांची पायमल्ली करणार आहे या कायद्याचा फटका पत्रकारांनाही बसणार आहे. एक एप्रिल २०२५ पर्यंत या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सरकारने हरकती मागवल्या होत्या २९ हजार व्यक्ती व संस्थांनी पक्षांनी या हरकती दिल्या आहेत शेतकऱ्याला हमीभाव मिळत नाही. उत्पादन खर्च आणि बाजारभाव यात तफावत आहे त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे. भांडवलदारांचे लाखो कोटी रुपये कर्ज सरकारने माफ केले मात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यास सरकार टाळाटाळ करीत आहे.

लोकशाहीचा पत्रकारिता हा चौथा स्तंभ आहे परंतु त्यांच्या स्वातंत्र्यावरही दिवसेंदिवस बंधने येत आहेत. शिक्षकांना अनावश्यक कामात गुंतवून त्यांना ताणतणावात ठेवले जात आहे. कामगारांसाठी कल्याणकारी कायदे केल्याचा देखावा निर्माण केला जात आहे मात्र त्यांना कामगार म्हणून प्रमाणपत्र देण्यास ग्रामसेवकांना प्रतिबंधित केले जात आहे. संघटितपणे सरकारवर दबाव आणल्याशिवाय आपले प्रश्न मार्गी लागू शकत नाहीत आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून सर्व क्षेत्रातील कामगार कर्मचारी शेतकरी शिक्षक यांनी एकत्र येऊन या मिरवणुकीची शोभा वाढवावी सायंकाळी चार वाजता या मिरवणुकीत महात्मा फुले पुतळ्यापासून सामील व्हावे असे आव्हान किसान संघर्ष समितीच्या सुशिलाताई मोराळे टीचर्स डेमोक्रेटिक फेडरेशन, अखिल भारतीय अध्यापक सभा, आझाद जय हिंद कामगार संघटनेचे फिरोज पठाण, महाराष्ट्र मजूर फेडरेशनचे अमर शेख, शिक्षक समन्वय संघाचे दत्ताभाऊ चव्हाण, ओबीसी चे नेते माजी नगरसेवक खुर्शीद आलम, संस्था महासंघाचे सरचिटणीस उत्तमराव पवार उपाध्यक्ष सर्जेराव काळे सर, डीपीआयचे जिल्हाध्यक्ष सुभाष लोणके, क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे शाहिद कादरीसह ऊसतोड कामगार संघटनेचे नेते संतोष काळे सह मान्यवरांनी केले आहे.

पान १ वरून...

## बीडचा युवक नाशिकच्या रामकुंडात वाहून गेला

यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. रात्री उशिरापर्यंत शोध मोहिम राबवण्यात आली मात्र अंधार आणि प्रवाहामुळे अडचणी आल्या आणि तरुणाचा काहीही थांगपत्ता लागला नाही. त्यामुळे मंगळवारी सकाळपासून पुन्हा एकदा शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. गोदावरी नदीच्या पात्रात सध्या मोठ्या प्रमाणावर पानवेली वाहून आल्या आहेत. त्या पानवेलीत हा तरुण अडकला असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर पानवेली हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या कामासाठी जेसीबी यंत्राचा वापर करण्यात येत असून, आपत्ती व्यवस्थापन पथक व पोलीस दल घटनास्थळी कार्यरत आहेत. दरम्यान, या घटनेमुळे रामकुंड परिसरात भीतीचं वातावरण आहे. श्राद्धपक्ष असल्याने गोदावरी घाटावर मोठी वर्दळ आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणांकडून नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नदी पात्रात उतरणे टाळावे, पाण्याच्या प्रवाहात जाऊ नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# १ मे - संघर्ष, सन्मान आणि अस्मितेचा दिवस

सकाळी ऑफिसला जाणाऱ्या लोकांच्या चेहऱ्यावर जरा वेगळाच उत्साह असतो. सरकारी इमारतींवर ध्वज फडकत असतो. शाळांमध्ये विशेष कार्यक्रमांची तयारी चाललेली असते. आणि अनेक ठिकाणी रस्त्यांवरून एखादी उत्साही रॅली जाताना दिसते. हाच तो दिवस - १ मे. परंतू हे सगळं केवळ एक दिवस म्हणून पाहिलं, तर त्यामागचा इतिहास, संघर्ष, आणि गौरव आपल्याला उमगणार नाही. या एका तारखेत दोन लढ्यांची, दोन वेगवेगळ्या पण समांतर वाटचालींची आठवण दडलेली आहे - कामगारांच्या हक्कांची आणि मराठी अस्मितेच्या स्वाभिमानाची.

कामगारांची जागतिक चळवळ - श्रमाचा सन्मान

१८८६, अमेरिकेतील शिकागो. धूळ उडवत चाललेले हजारो पाय. मागणी होती - आठ तासांचा कामाचा दिवस. कारखान्यांमध्ये दिवसाचे १२-१६ तास राबवले जात होते. कामाच्या ठिकाणी सुरक्षा नव्हती, सुट्ट्या नव्हत्या, आणि आरोग्य व्यवस्थेची तर कोणी कल्पनाही केली नव्हती. शिकागोतील हे आंदोलन चिरडायला पोलिसांनी गोळीबार केला, अनेकजण शहीद झाले. पण त्याचवेळी, श्रमाला आवाज मिळाला. त्याच लढ्यातून जन्म झाला - ‘मजूर दिना’चा, ज्याला आपण मराठीत ‘कामगार दिन’ म्हणतो. ही लढाई केवळ अमेरिकेपुरती मर्यादित राहिली नाही. जगभर पसरली. भारतात १९२३ साली चेन्नईत (तेव्हाचं मद्रास) पहिल्यांदा १ मे ’कामगार दिन’ म्हणून साजरा करण्यात आला. ही चळवळ देशभर कामगार संघटनांमध्ये पसरत गेली. आज अनेक ठिकाणी कामाचे ठरलेले तास, सुट्ट्या, सुरक्षा व्यवस्था दिसतात - पण ते काही आपसूक आलेले नाहीत. या सगळ्या मागे एका दीर्घ लढ्याची, संघटनेची, त्यागाची आणि बलिदानाची कथा आहे.



आधुनिक काळात ’कामगार’ ही संकल्पना बदलली आहे. फक्त कारखान्यातला कामगार नव्हे - तर रिक्षाचालक, बांधकाम मजूर, महिला बचत गटांतील महिला, डिलिव्हरी बॉय, तंत्रज्ञान क्षेत्रातील फ्रिलान्सर्स, खढ मधील काम करणारे, शेतीतले कामगार - हे सारेच आजच्या अर्थव्यवस्थेचे शिल्पकार आहेत.

पण अजूनही अनेक क्षेत्रांमध्ये कामाच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न आहेत. कधी कधी आपल्या नजरेस पडतही नाही, पण आपल्याला मिळणाऱ्या अनेक सेवांमागे अदृश्य श्रमाचा मोठा हात असतो. ‘कामगार दिन’ म्हणजे या श्रमांची आठवण ठेवण्याचा दिवस आहे - केवळ एक दिवस साजरा करण्यासाठी नव्हे, तर रोजच्या आयुष्यात त्यांचं योगदान समजून घेण्यासाठी.

**अस्मितेचा संघर्ष आणि गौरव**

’महाराष्ट्र’ हे नाव आज आपण किती सहज उच्चारतो. पण त्या नावामागेही एक लढा आहे. एक प्रखर आंदोलन आहे. आणि शेकडो हुतात्म्यांचं बलिदान आहे. १९५० च्या दशकात , राज्य पुनर्रचनेचा मुद्दा देशात गाजत होता श्र. भाषिक आधारावर राज्यं बनवायचं ठरलं. मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य हवं, ही मागणी तितक्याच तीव्रतेने पुढे आली. संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाली. गावोगावी सभा झाल्या, मोर्चे निघाले.

या आंदोलनाचा केंद्रबिंदू होता - मुंबई. गुजराती भाषिकांसाठी स्वतंत्र गुजरात, आणि मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र महाराष्ट्र हवा - ही मागणी आता पेट घेत होती. २१ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईतील फ्लोरा फाउंटनवर पोलिस गोळीबार झाला. १०६ हुतात्म्यांनी आपलं प्राणार्पण केलं. त्यांच्या स्मरणार्थ , आज त्याठिकाणी उभा आहे - ‘हुतात्मा चौक’. हे बलिदान व्यर्थ गेलं नाही. अखेर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची अधिकृत स्थापना झाली. त्याच दिवसापासून आपण ‘महाराष्ट्र दिन’ साजरा करतो. शासकीय इमारतींवर ध्वज फडकतो, परेड होते, शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम होतात, आणि हुतात्म्यांना अभिवादन केलं जातं. पण या सर्व गोष्टींपलीकडे, हा दिवस आपल्याला सतत आठवण करून देतो - आपली भाषा, आपली संस्कृती, आपली ओळख - ही फक्त परंपरेत टिकत नाही, तर ती लढून मिळवावी लागते. या दोन घटनांचं एकत्र येणं म्हणजे एक विलक्षण योगायोगच नव्हे - तर समांतर लढ्यांची एकसंध जाणीव आहे. कामगारांनी कामासाठी लढा दिला. मराठी जनतेने अस्मितेसाठी लढा दिला. दोघांचाही आधार एकच - सामूहिक संघर्ष. आजही आपल्यासमोर नवे प्रश्न आहेत - ग्रामीण भागाचा विकास, श्रमिकांचे कल्याण आणि भाषिक अस्मिता. १ मे आपण साजरा करतो तो याच जागरासाठी - संघर्ष आठवण्यासाठी, आणि नव्या पिढीसमोर त्याची प्रेरणा ठेवण्यासाठी. महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या अनेक शुभेच्छा !

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

# पाण्याअभावी हजारो हेक्टरवरील पिके धोक्यात

## जायकवाडीचे पाणी थर्मलला, महिना उलटला तरी सोडेनात सिंचनाला शेतकरी संकटात, परळी तालुक्यात पिके करपू लागली




सिरसाळा । प्रतिनिधी
परळी तालुक्यातील हजारो हेक्टरवरील पिके पाण्या अभावी धोक्यात सापडली आहेत. ऊस व हंगामी पिके करपू लागली आहेत. जायकवाडी मधून उजव्या कालव्यात पाणी सोडले आहे, हे पाणी थर्मलला सुरु आहे परंतु अद्याप उजव्या कालव्यातून सिंचनासाठी चाऱ्यांना पाणी सोडले नाही, थर्मलला मात्र आठ दिवसांपासून पाणी पुरवठा केला जातो आहे. पाण्या अभावी पिके करपत असतांना, शेतकरी संकटात सापडलेला असतांनाची परिस्थिती आहे मात्र याचे संबंधित पाट बंधारे विभागाला कसलेही गांभीर्य असल्याचे दिसत नाही.

काळ्या मातीच्या जमिनीवरील पिके सुकू लागली तर बरडी, मुरमाड, हलक्या जमिनीवरील पिके तर अक्षरश वाळू लागली आहेत, हि परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी चिंतेत आहे. अजून चार पाच दिवस तरी सिंचनासाठी पाणी सोडल्या जाणार नाही असे पाटबंधारे विभागाचे अधिकारी सांगत आहेत. महिणा महिणा पाणी पिकांना मिळत नसेल तर अशा उष्ण कडक उन्हाळ्यात पिके तग धरु शकणार नाहीत, वेळेवर पाणी न मिळाल्यास सहाजिकच उत्पन्नावर परिणाम होणारा आहे. जायकवाडी च्या पाण्याच्या अपेक्षेवर शेतकऱ्यांनी खुप मोठ्या प्रमाणावर ऊस लागवड केलेली आहे. परंतु वेळेत पाणी सोडले जात नसल्याने ऊस उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे.

**शेतकऱ्यांना घेऊन पाटबंधारे विभागाच्या दारात बसणार : लक्ष्मण पौळ**

पाट बंधारे विभागाचे अधिकारी जाणूनबुजून शेतकऱ्यांना सिंचनासाठी वेळेवर पाणी सोडत नाहीत, वेळेवर पाणी न मिळाल्याने ऊसउत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. पाण्या अभावी ऊस /पिके करपत आहेत, पाट बंधारे अधिकाऱ्यांना फोन करुन विचारले असता उडवा उडवीची उत्तरे देत आहेत. थर्मलला पाणी दिल्या जात आहे असे म्हणत आहेत. थर्मल च्या पाण्याला आमचा काही विरोध नाही परंतु महिणा उलटला आहे, सिंचनासाठी चाऱ्यांना अद्याप पाणी सोडले नाही. शेतकरी चिंतेत सापडला आहे. दोन दिवसांत पाणी नाही मिळाले तर पिकांचा धुरुळा होऊन जाईल. या मुळे शेतकरी वर्ग खुप संतापला आहे. दोन दिवसात पाणी सोडले नाही तर शेतकऱ्यांना घेऊन पाट बंधारे विभागाच्या दारात बसुन अंदोलन केले जाईल असा ईशारा ऊस उत्पादक शेतकरी तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक लक्ष्मण पौळ यांनी दिला आहे.

# श्रीक्षेत्र जगन्नाथपुरी, गंगासागर एक धाम तिर्थयात्रा यशस्वी केल्याबद्दल शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांचा सत्कार




लिंबागणेश । प्रतिनिधी
श्रीगुरू ईश्वर बाबा भारती यात्रा सत्संग निमित्ताने श्रीक्षेत्र जगन्नाथपुरी, गंगासागर एक धाम तीर्थ यात्रा, (ओडीसा ) भगवान श्री राम लल्ला जन्मभूमी अयोध्या (उत्तर प्रदेश) तिर्थ यात्रा यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल आज दि.२९ मंगळवार रोजी सकाळी ग्रामपंचायत लिंबागणेश यांच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात यांनी यात्रेचे आयोजक श्रीगुरू ईश्वर बाबा भारती बेलेश्वर संस्थान, बेलगावचे मठाधिपती शांती ब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन महाराजांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी तर सूत्रसंचालन हरिओम क्षीरसागर यांनी केले.

यात्रेत सहभागी झालेले गणपत तागड यांनी आपल्या यात्रेदरम्यान अनुभव सांगताना यात्रेकरूंना धार्मिक स्थळांची महती व आस्थेने यात्रेकरूची काळजी घेतली याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. याचवेळी ह.भ.प. अनंतकाका मुळे यांनी समायोजित मार्गदर्शन केले. शांती ब्रम्ह तुकाराम महाराज यांनी सत्काराला उत्तर देताना हे तिर्थयात्रेचे तिसरे वर्ष असुन गेल्यावर्षी ३०० भाविकां समवेत द्वरकाधाम करण्यात आले होते. यावर्षी ५०० भाविकांचा सहभाग ९ स्लिपर कोच गाड्यांची व्यवस्था करण्यात आली होती. दि.१२ एप्रिल रोजी बेलेश्वर संस्थान येथुन प्रस्थान करून मध्यप्रदेशातील ओंकारेश्वर, उज्जैन येथील महाकाल ज्योतिर्लिंग तसेच उत्तर प्रदेश प्रयागराज त्रिवेणी संगम स्नान, अयोध्या शरयु नदी स्नान, श्रीराम जन्मभूमी मंदिर दर्शन, हनुमान गढी दर्शन वाराणसी येथे गंगानदी स्नान, काशि विश्वनाथ मंदिर दर्शन, कालभैरव मंदिर दर्शन,८४ घाटांचे दर्शन, बिहार येथील बौद्ध गया गौतम बुद्ध स्मारक, पश्चिम बंगाल येथे गंगा सागर संगम, कपिल मुनी आश्रम, ओडीसा मधील जगन्नाथ पुरी (चारधाम पैकी एक), कोणार्क सुर्य मंदिर दर्शन, भुवनेश्वर लिंगराम मंदिर दर्शन, महाराष्ट्रातील रामटेक येथील श्रीराम मंदिर दर्शन, शेगाव येथील श्रीसंत गजानन महाराज समाधी दर्शन आदी तिर्थक्षेत्रांचे दर्शन करून दि.२६ एप्रिल रोजी बेलेश्वर संस्थान बेलगाव याठिकाणी समारोप करण्यात आला.

भविष्यात आणखी मोठ्या प्रमाणावर भाविकांच्या सहकार्याने धार्मिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. लिंबागणेश येथील ग्रामस्थांनी शांती ब्रम्ह तुकाराम महाराजांची सजवलेल्या रथातून मिरवणूक काढत सुवासिनींनी औक्षण करत लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर मंदिरापर्यंत आतिषबाजी करत मिरवणूक काढण्यात आली. शेवटी आभार प्रदर्शन डॉ.गणेश ढवळे यांनी केले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, महादेव कुदळे, दादा गायकवाड, अॅड. गणेश वाणी, पांडुरंग वाणी, संतोष भोसले, संजय घोलप, वरद जोशी, चेतन कानिटकर, गणेश लिंबेकर आदि उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेवून आई - वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे : अॅड सुरेश हात्ते

## स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी ध्येय गाठावे : पीआय कोळी



तलवाडा । प्रतिनिधी
छत्रपती सेवाभावी संस्था संचलित त्वरितापुरी कला व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय तलवाडा येथे पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम २७ एप्रिल रोजी संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य अॅड.सुरेशराव हात्ते हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार खोमणे, तलवाडा पोलीस स्टेशन चे पीआय स्वप्नील कोळी, पीआय बोडखे, संस्थेच्या सचिव डॉ.अक्षया हात्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

गाव खेड्यातून विद्यार्थ्यांना गेवराई,बीड,छत्रपती संभाजी नगर, यासह अनेक ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी जावे लागत होते, अनेक गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाचा आर्थिक भार परवडत नव्हता त्यामुळे काही विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असूनही जमत नव्हते याची जाणीव मनात ठेवून गेवराई तालुक्यातील तलवाडा सारख्या ग्रामीण भागात तलवाडा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य तसेच गोदाकाठचे भूमिपुत्र अॅड.सुरेशराव हात्ते यांनी वरिष्ठ महाविद्यालय स्थापन केले. या महाविद्यालयातून सर्व सामान्य मुलांना शिक्षण देवून त्यांच्या पंखांना बळ देण्याचे काम होत असल्याचे मत पदवी वितरण समारंभात मान्यवरांनी व्यक्त केले.

यावेळी अॅड सुरेशराव हात्ते, पीआय स्वप्नील कोळी, पीआय बोडखे, डॉ. आक्षया हात्ते यांनी आपले मनोगत व्यक्त करून आलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास सेवा सोसायटी चे चेअरमन जयराम नाटकर, पोलीस बागलाने, शेख अपसर भाई, विकास हात्ते, दादाराव रोकडे, दादाराव काकडे, नाथा कावळे यांच्या सह विद्यार्थी पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. भारत चव्हाण सर यांनी केले.

# गेवराई पं.स.च्या गटविकास अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे हजारो शेतकरी व मजुरांचे करोडो रुपयांचे नुकसान?

## करोडो रुपयाचा निधी वितरीत न करता परत पाठविणाऱ्या गटविकास अधिकारी यांना बडतर्फ करण्याची मागणी अन्यथा शेतकऱ्यांसह वंचित बहुजन आघाडी आंदोलन करणार

गेवराई । प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील मनरेगा योजने अंतर्गत झालेल्या कामाचे व निगालेल्या मस्टरचा निधी रोहयोतील मजुरांच्या खात्यावर वितरीत न करता तो निधी परत पाठवला असल्याची तक्रार अनेक शेतकऱ्यांनी वंचीत बहुजन आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड यांच्याकडे केली, त्यानुसार आज दि. २९ रोजी मा. जिल्हाधिकारी यांना भेटुन सविस्तर चर्चा करुन शेतकरी व मजुरांचे करोडो रुपयांचे नुकसान करणाऱ्या गेवराई पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांची चौकशी करुन यांना बडतर्फ करा अशी मागणी निवेदनाद्वारे केली.

मागील दोन वर्षांपासून सिंचन विहिर, शेततळे, मोहगुणी, गायगोठे या वयक्तीक लाभाच्या योजनेतील कामे पूर्ण केली असतांना देखील अकुशल व कुशलची बीले दिली जात नसल्याने शेतकरी अर्थीक आडचणीत सापडला आहे तर रोहयो मधील मजुरांचा निधी वितरीत न केल्याने मजुरांवर उपासमारीची वेळ येवुन ठेपली आहे. मागिल ६ महिन्यांपासून गटविकास अधिकारी यांच्या लॉगिनवर सेकंड सिग्नेचरसाठी सिंचन विहिर, गायगोठा, शेततळे या योजनांचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यता घेवुन, सिक्युअर भरुन घेतले होते परंतु गटविकास अधिकारी यांनी ऑनलाईन सेकंड सिग्नेचर न केल्याने सर्व योजनां मुदतबाह्य झाल्या आहेत. तर काही शेतकऱ्यांचे गायगोठा, सिंचन विहिर व शेततळे तसेच नविन गायगोठा, सिंचन विहिर, शेततळे यांना मंजुरी दिली जात नसल्याने शेतकऱ्यांना पंचायत समितीत खेट्या माराव्या लागत आहेत.

त्याचबरोबर रमाई, प्रधानमंत्री, शबरी व मोदी आवास योजनेची बांधकामे पूर्ण झालेली असतांना हाप्ते टाकण्यात टाळाटाळ करतात, नविन घरकुलच्या मंजुऱ्या वेळेवर केल्या जात नसून घरकुल योजनेचे ऑपरेटर तावरे तसेच काही कंत्राटी इंजिनियर लाभार्थ्यांना मुजोरी करुन उद्धटपणाने वागतात तसेच अंगावर धावुन जाऊन माझे कोणीच वाकडे करू शकत नाही तुम्हाला कोणाकडे तक्रार कराची तिथे करा अश्या पद्धतीने गैरव्यवहार करत आहे यावर गटविकास अधिकारी यांचे नियंत्रण नाही.

रोहयो योजनेतील २०२३/२०२४ च्या सर्व संचिका तपासण्यात याव्यात कारण यात कर्मचारी व अधिकारी यांनी संगणमताने मोठा भ्रष्टाचार केलेला आहे, तसेच गेवराई पंचायत समितीतील घरकुल योजना व रोजगार हमी योजनेचे सर्वच कर्मचारी मगृर झाले असून सर्वांची तात्काळ बदली करण्यात यावी तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती गेवराई यांची उच्चस्तरीय समीती मार्फत चौकशी करुन त्यांना बडतर्फ करण्यात यावे अन्यथा येत्या ७ मे रोजी तहसिल कार्यालय गेवराई येथे गेवराई तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासह शेतकरी, रोहयो मजुर घरकुल लाभार्थी यांना सोबत घेऊन तिव्र स्वरूपाचे अंदोलन करु असा ईशारा अजयकुमार गायकवाड, राजेंद्र पोकळे, किशोर भोले, रेवन गायकवाड, ज्ञानेश्वर हवाले, कृष्णा हातागळे यांनी स्वाक्षऱ्या करुन मा. जिल्हाधिकारी बीड व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला.



# डॉ. शेख अरबाज यांनी वैद्यकीय अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला

गेवराई । प्रतिनिधी
गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील रहिवासी असलेले व सध्या शिक्षक म्हणून कार्यरत असणारे शेख ऐनोद्दीन शेख बशिरोद्दीन यांचे चिरंजीव डॉ. शेख अरबाज शेख ऐनोद्दीन याने पाटोदा तालुक्यातील मौजे डोंगरकिन्ही प्रा.आ. केंद्राचे वैद्यकीय अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला आहे. वैद्यकीय अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. शेख अरबाज शेख ऐनोद्दीन यांचा तेथील ग्रामस्थ, सरपंच व आरोग्य कर्मचारी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तलवाडा सारख्या ग्रामीण भागातील अल्पसंख्याक समाजातील मुलगा डॉक्टर झाल्यामुळे अनेकांनी शेख ऐनोद्दीन सर व त्यांचा मुलगा डॉ. शेख अरबाजोद्दीन यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



बीड : चौसाळा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंती निमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी सरपंच राजेश (आप्पा) नाईकवाडे यांचा सत्कार करताना आयोजक पवन कुचेकर, ग्रामपंचायत सदस्य दादा सोनवणे, प्रदीप इंगोले सह आदी.

# निञूड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी
दरवर्षी प्रमाणेयाही वर्षी परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती दि.२९ एप्रिल रोजी निञूड नगरीमध्ये साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे रूपरेषा प्रथम पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. व रात्री ठीक सहा वाजता प्रतिमेचे भावी दिव्य मिरवणूक गावामध्ये काढण्यात आली. या मिरवणूक मध्ये गावातील सर्वांनी जातीय सलोखा सहभाग नोंदविला.

कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. यामध्ये प्रथम नागरिक सरपंच कॉ.दत्ता डाके, मनोहर डाके, शेख चांद साहेब, शरद बोरचाटे, संभाजी शिंदे, दत्ता आवाड, शेख आतू भाई, अशोक डाके, बंडू राठोड, आप्पा बडे, नवनाथ कांबळे, पांडुरंग आव्हाड, तुळशीराम आव्हाड, बाळासाहेब आव्हाड, राधे कांबळे आधी उपस्थित होते.

जयंतीचा कार्यक्रम पार पाडण्यासाठी राज आव्हाड, धुराजी आव्हाड, राधाकिसन हातागळे, शिवा आव्हाड, दिनेश आव्हाड, मा.ह.चे युवा नेते कपिल आव्हाड, गजानन गोरे, सुमित आव्हाड, माऊली जाधव, विराट आव्हाड, खंडू शिंदे, सुनील शिंदे, किरण शिंदे आदींनी परिश्रम घेतले.






# व्ही.व्ही. भावठाणकर यांचा सेवागौरव सोहळा उत्साहात

अंबाजोगाई । प्रतिनिधी
येथील यो.शि.संस्था संचलित योगेश्वरी नूतन विद्यालयाचे पर्यवेक्षक तथा गणित विषयाचे निष्णात अध्यापक व्ही.व्ही.भावठाणकर हे शासकीय वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवेचा यथोचित गौरव योगेश्वरी नूतन विद्यालयाच्या वतीने उत्साहात संपन्न झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष जी.बी.व्यास, सचिव कमलाकर चौसाळकर, सल्लागार एन.के.गाळेगावकर, एम.एस.लोमटे, संचालक ॲड.के.जे.विर्धे, आर.व्ही. सोनवळकर, सय्यद पाशुमियाँ, एल.जी.वैद्य, मुख्याध्यापिका ए.आर. पाठक, सत्कारमुर्ती व्ही.व्ही.भावठाणकर, कुंदा भावठाणकर आदी उपस्थित होते.

भावठाणकर यांनी आपल्या सेवाकालात संस्थेतील तसेच विद्यालयातील विविध जबाबदाऱ्या सक्रियपणे सांभाळल्या. तसेच सहकारी व संस्थेविषयी स्नेहभाव जोपासून तळमळीने कार्य केले एक उत्तम अध्यापक कसा असावा याचे उदाहरण म्हणजे व्ही.व्ही. भावठाणकर होय तो आदर्श इतरांनी घ्यावा असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

योगेश्वरी शिक्षण संस्थेतील शिक्षकांनी अध्यापन कौशल्य जपल्यानेच विद्यार्थी घडले त्यांचा सर्वांगिण विकास झाल्याचे चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते भावठाणकर यांच्या सेवेचा यथोचित सपत्नीक गौरव करण्यात आला. उपस्थितांचे स्वागत विद्यालयाच्या वतीने करण्यात आले प्रास्तविक मुख्याध्यापिका ए.आर. पाठक यांनी केले, संचालन एम.के. कुलकर्णी आभार व्ही.के.गायकवाड यांनी मानले. यावेळी शिक्षक कर्मचारी इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुप्रसिद्ध कार्डिओलॉजिस्ट डॉ. मुहम्मद सिद्दिक अहेमद यांचा हृदयी सत्कार




बीड । प्रतिनिधी
शहरातील पॅराडाईज हॉस्पिटलचे प्रसिद्ध कार्डिओलॉजिस्ट डॉ. मुहम्मद सिद्दिक अहेमद यांनी बीड जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच ओपन हार्ट सर्जरी करून आरोग्य क्षेत्रात रुग्णांसाठी एक मोठी उपलब्धी निर्माण करून दिली आहे. यामुळे पॅराडाईज हॉस्पिटल येथे डॉ. मुहम्मद सिद्दिक अहेमद यांचा साप्ताहिक द स्कूल एक्सप्रेस चे मुख्य संपादक शेख एजाज यांनी हृदयी सत्कार केला.

यावेळी त्यांच्यासोबत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ, कॉमर्स कॅडमी चे संचालक प्रा. आर.पी.कुलकर्णी आणि अविष्कार कोचिंग क्लासेसचे प्रा. सुनील खंडागळे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. मुहम्मद सिद्दिक अहेमद यांनी रुग्णसेवेत पॅराडाईज हॉस्पिटलचे एक पाऊल पुढे टाकल्याने या छोटेखानी सत्कारात सर्व उपस्थितांनी मनस्वी अभिनंदन करून यापुढेही ते रुग्णांना अशाच प्रकारे चांगल्यात चांगल्या सेवा देऊन बरे करतील, अशा अपेक्षा व्यक्त करत पुढील कार्यासाठी सदिच्छा व शुभेच्छा दिल्या.

# माजी आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी शिफारस केलेल्या दहा हजार रुपये आर्थिक मदत शासन करणार का?

## बीड जिल्हा पॅटर्न म्हणून राज्यभर राबवलेली पिकविमा योजना अखेर बंद? शेतकऱ्यांच्या हिताची योजना नव्हतीच यात फक्त कंपनीला फायदा

गेवराई । प्रतिनिधी
एक रुपयात पीक विम्याची गेली दोन वर्षे राज्यात सुरू असलेली योजना आता गुंडाळण्यात आली आहे. या योजनेत दोन वर्षात कोट्यवधी रुपयांचा घोटाळे झाल्याचे आरोप जिल्ह्याजिल्ह्यात झाले होते.
अखेर कंपन्यांच्या फायद्यासाठी असलेली एक रुपया पिक विमा योजना बंद राज्य शासनाने मागील तीन वर्षापूर्वी सुरु केलेली एक रुपया पिक विमा ही शेती संबंधात असलेली पिक विमा योजना अखेर राज्य शासनाने दप्तरात गुंडाळून ठेवलीय सविस्तर वृत्त असे की की राज्य व केंद्र सरकार यांचे समान हिस्से मिळून व शेतकऱ्याचा एक रुपया असा सर्व म्हणून विमा कंपनी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देत होते. या



योजनेत शेतकऱ्यांना नफा कमी व कंपन्या मालामाल झाल्या आजपर्यंत मागील पाच वर्षात कंपन्यांनी दहा हजार कोटी रुपये नफा कमवला परंतु शेतकऱ्यांना थोडीफार तुटपुंजी मदत देऊन शेतकऱ्यांची बोळवण केली आणि शेतकऱ्यांच्या नावे बोगस विमा भरून सीएससी चालकांनी शासनाला खूप लुटले म्हणून राज्य शासनाने सदरील एक रुपयात पिक विमा योजना ही गुंडाळून ठेवली व मागील चालू असलेली विमा योजना हीच शेतीसाठी लागू ठेवण्यात आली आहे तरी राज्य शासनाने याबाबत माजी आयुक्त सुनीलजी केंद्रेकर यांनी शिफारस केलेली शेतकऱ्यांना खरीपासाठी दहा हजार व रब्बी साठी दहा हजार याप्रमाणे शिफारस केलेले दोन्ही सीजनला दहा दहा हजार रुपये मदत याबाबत विचार करावा व कंपन्यांच्या लाभासाठी असलेले पिक विमा योजना कायमचीच बंद करून टाकावी. यावर पर्याय म्हणून एकरी दहा हजार रुपये खरीप व रब्बी साठी दहा हजार रुपये याप्रमाणे राज्य शासनाने शेतीसाठी अर्थसहाय्य करावे अशी मागणी होत आहे.

# मुख्याधिकारी यांच्या मनमानी कारभारामुळे मुख्य रस्त्यावरील चालू बोर बुजला

## बीड जिल्ह्याचे वरिष्ठ अधिकारी याकडे लक्ष देणार का ?

धारूर / प्रतिनिधी
धारूर शहरातील मुख्य रस्त्याचे काम गेल्या एका महिन्यापासून सुरू असल्याने धारूर मुख्य रस्त्यावर बालाजी मंदिराजवळ चालू असलेले बोर नगर नगरपरिषदेने चालू बोअर उकरून बुजून टाकून त्या परिसरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची भर उन्हाळ्यात हेळसांड केली असल्यामुळे वारंवार तोंडी सांगूनही किल्ले धारूर नगर परिषदेने तो बोअर चालू केलेला नसल्याने काल धारूर येथील संतप्त नागरिकांनी नगरपरिषद कार्यालयास बोर चालू करण्यात यावा असे निवेदन देण्यात आलेले आहे
गेल्या एका महिन्यापासून रस्त्याच्या कामामुळे नालीच्या कामामुळे किल्ले धारूर नगरपरिषदेने बालाजी मंदिर जवळील गेल्या कित्येक वर्षांपासून नागरिकांची तहान भागवणारा बोर किल्ले धारूर नगर परिषदेने रस्त्याच्या कामासाठी तो बुजला आहे व त्या ठिकाणी भर उन्हाळ्यात नागरिकांची पाण्यासाठी वन वन होताना दिसून येत आहे हे लक्षात घेता काल नागरिकांनी मुख्याधिकारी नगरपरिषद धारूर यांना








निवेदन दिले आहे व निवेदनात असे म्हटले आहे की सदरील बोर हे दिनांक ४ मे पर्यंत कारव्यांनीवीत करा सुरळीत करा अन्यथा दिनांक ५ मे रोजी नगरपरिषद कार्यालय समोर उपोषणास बसणार आहोत असे या निवेदनात म्हटले आहे व निवेदनात रोहित मुकुंद फावडे विनोद कोकाटे नितीन शेटे प्रवीण शेटे महेश शेटे असे यांच्यासह अन्य नागरिकांच्या सह्या आहेत.

### नगरपरिषदेने तात्काळ बोर चालू करावा अन्यथा उपोषण करणार – रोहित फावडे

किल्ले धारूर नगरपरिषदेने केलेला हा कारभाराने मागच्या एक महिन्यापासून नागरिकांच्या तोंडाचा घास हिसकावून घेतलेला आहे. नगरपरिषदेचे डोके ठिकाणावर आणण्यासाठी दि.२९ एप्रिल रोजी निवेदन देऊन चार दिवसात तात्काळ बोर चालू करण्यासाठी निवेदनाद्वारे मागणी केली असून अन्यथा ५ मे पासून उपोषण करणार आहे.

# जयवंती नदीवरील उपोषणाला राजकीय लोकांची पाठ तर सर्वसाधारण लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी
अंबाजोगाई शहरातून वाहत असलेल्या जयवंती नदीवरील अतिक्रमण हटवण्यासाठी मागील दोन दिवसापासून अंबाजोगाई डिजिटल मीडियाचे अध्यक्ष अभिजीत लोमटे हे आमरण उपोषणाला बसले असून आज उपोषणाचा दुसरा दिवस या उपोषणाला शहरातील विविध राजकीय पुढारी यांनी सपशेल पाठ फिरवली असे दिसून येत आहेत तर नदीपात्र वाचवण्यासाठी शहरातील सर्वसाधारण आम जनता ही या उपोषणाला पाठिंबा देत आहेत.
यावेळी उपोषणाच्या ठिकाणी येऊन आपले मत मांडत व या नदीचा इतिहास काय होता आणि आजची परिस्थिती काय यावर बोलताना म्हणाले एकेकाळी या नदीवरून पावसाळ्याच्या काळी पुराचे पाणी वाहत होते आज ती परिस्थिती मागील बऱ्याच वर्षापासून दिसून येत नाही याला एकमेव कारण म्हणजे नदीच्या आजूबाजूला केलेल्या अतिक्रमणामुळे येणारे पाणी अडवले जात आहे. भविष्यात एखादा मोठा प्रलय आला




तर जयवंती नदीमध्ये केलेल्या अतिक्रमणामुळे बऱ्याच गोरगरिबांची वित्तहानी सोबत जीवित हानी होऊ शकते याची खबरदारी शासनाने घ्यावी याकरिता मागील दोन दिवसापासून डिजिटल मीडियाचे अध्यक्ष अभिजीत लोमटे हे उपोषणाला बसले आहेत.
यावर लवकरात लवकर कठोर पावले उचलून अतिक्रमणधारकांना आपले अतिक्रमण काढण्यास सांगावे किंवा शासनातर्फे काढण्यात यावे जेणेकरून जयवंती नदीतील वाहणारे पाण्याला मोकळा श्वास घेता येईल असे सर्वसाधारण अंबाजोगाई कर नागरिकांचे म्हणणे आहे

# नवीन जिल्हाधिकाऱ्यांकडून बीडकरांचा पूर्ण अपेक्षा भंग : प्रा.तांदळे

## बीड जिल्हाधिकाऱ्यांचे जनता दरबाराचे आयोजन कशासाठी?

बीड । प्रतिनिधी
बीड शहर बचाव मंचाचे प्रमुख मार्गदर्शक कॉ. प्राचार्य डी.जी.तांदळे, नितीन जायभाये, कॉम्रेड सुधीर देशमुख, डॉ.संजय तांदळे, रूपालीताई देशपांडे, ड.अनिल बारगजे, ड.नितीन वाघमारे, हाफिज मोईनुद्दीन शेख शहर काझी, बीएसपी चे जि. अध्यक्ष प्रशांत वासनिक, संपादक–पत्रकार नितेश उपाध्ये, बाजीराव ढाकणे आधी सहकार्यांनी नवीन जिल्हाधिकारी साहेबांची भेट घेतली.
बीड शहरातील अतिशय उग्र स्वरूप धारण करू लागलेली भीषण पाणीटंचाई व इतर अनेक गंभीर प्रश्न–गंभीर समस्या व शहरातील नागरिकांचे त्या अनुषंगाने चाललेले हाल त्यांच्यासमोर पोट तिडकीने मांडले. नवीन जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी पदभार स्वीकारल्यानंतर बीड जिल्ह्याचा कारभार जनताभिमुख करणार असां काहीसा भास निर्माण करण्यात आला होता. त्या अनुषंगाने त्यांनी जनता दरबाराचे आयोजन केलेले आहे. काल दुसऱ्याच दिवशी जनता दरबार केवळ फार्स वाटावा इतपत बीडकरांचा अपेक्षाभंग झाला आहे असे असे कॉ. प्रा. डी.जी. तांदळे यांनी सांगितले आहे. जनता दरबाराच्या नाट्य बद्दल अधिक माहिती देताना तांदळे यांनी सांगितले



की, जनतेचे घराणे मांडताना प्रामुख्याने बीड नगर परिषदेचा गलथान, भ्रष्ट, मनमानी, बेपर्वा कारभार विशेषतः पाणीपुरवठा, भीषण पाणीटंचाई, स्वच्छता, धानोरा रोड, नगर रोड वरील यु'टर्न यासंबंधी मांडणी करताना कलेक्टर महोदय केवळ काही तांत्रिक व थातूरमातूर प्रतिसाद देत असताना जनतेचा अपेक्षा भंग करीत असल्याचे पुन्हा पुन्हा दिसुन येत होते. नगरपरिषद अस्तित्वात नसल्याने मुख्याधिकारी, अधिकारी, कर्मचारी ठराविक कंत्राटदार, प्रभावी राजकारणी यांचे पावले आहे. हे सगळे बेताल झालेले आहेत. जनतेच्या समस्या भीषण होत चाललेल्या आहेत. मुख्याधिकारी नीता अंधारे व काही कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करावे, नसता बदली करावी अशी आग्रहपूर्वक मागणी बीड शहर बचाव मंचाने केलेली आहे. परवा विभागीय आयुक्तांनी घेतलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग मीटिंगमध्ये देखील जनतेच्या आवश्यक रास्त तातडीच्या मागण्या बीड शहर बचाव मंचाने मांडल्या आहेत. जनता दरबारासाठी नागरिकांना जिल्हाधिकारी साहेबांची तीन तास प्रतीक्षा करावी लागली. जनतेच्या समस्या ऐकण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहून निवेदने वगैरे स्वीकारणार अशी माहिती प्रस्तुत झाल्याने विविध संघटना,पक्ष,युवा कार्यकर्ते, व्यापारी, जेष्ठ नागरिक, पत्रकार, डॉक्टर, विधीज्ञ, प्राचार्य, काझी, सामाजिक कार्यकर्ते, महिला असे दोनशेच्या वर लोक प्रतिनिधिक स्वरूपात मोठ्या संख्येने जमा झाले होते.भर उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटेमध्ये हॉलमध्ये लोकांची गैरसोय झाली होती.
कसल्याही प्रकारची पिण्याच्या पाण्याची व पंख्याची व्यवस्था केलेली नव्हती. पुरेशा खुर्च्या व बसण्याची व्यवस्था नसल्यामुळे अनेक लोक ताटकळत उभे राहूनच जनता दरबार करत होते. जिल्हाधिकारी साहेबांच्या या वागण्यावर बीड शहर बचाव मंचाने तीव्र असंतोष व्यक्त केला. त्यानंतर जिल्हाधिकारी साहेब यांनी तीन तासानंतर जनता दरबाराकडे धाव घेतली. जनता दरबार कशासाठी व कसा असतो हेच त्यांना स्वतःला अजून ही माहित नाही हेच निदर्शनास आले. जनता दरबारासाठी आलेले विविध क्षेत्रातील शंभराहून अधिक लोक संताप व्यक्त करत निघून गेले. जिल्हाधिकारी साहेबांनी घोषित केलेल्या फसव्या जनता दरबाराचा त्यांच्याच अवस्थेमुळे फज्जा उडालेला दिसून आला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवात ग्रामीण भागातील वीज पुरवठा खंडित होऊ देऊ नका : लोक जनशक्ती पार्टी

अंबाजोगाई । प्रतिनिधी
१४ एप्रिल ते ३० एप्रिल या कार्यकाळात डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती देशांमध्ये मोठे उत्सवात साजरी केली जाते. त्याच अनुषंगाने अंबाजोगाई कार्यकारी अभियंता श्री चाटे साहेब यांना निवेदन देण्यात आले. त्या निवेदनामध्ये अकोला देवळा तालुका अंबाजोगाई येथे दिनांक २९ ४ २०२५ ते ३० ४ २०२५ या कालावधीत महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम व मिरवणुकीचे आयोजन करण्यात आलेले आहे.



गेल्या दोन ते तीन वर्षापासून सदर कार्यक्रमाच्या वेळी काही समाजकंटक जाणीवपूर्वक तेढ निर्माण करण्यासाठी गावातील विद्युत पुरवठा खंडित करत आहेत त्यामुळे सदरील कालावधीत विद्युत पुरवठा खंडित न होण्याबाबत किंवा ड्रिप न होण्याबाबत आपल्या कार्यालयाकडून दक्षता घेण्यात यावी ही विनंती करण्यात आली सदर कालावधीत विद्युत पुरवठा खंडित झालास तर याची सर्व जबाबदारी ही कार्यकारी अभियंता यांची राहील याची दक्षता कार्यकारी अभियंता यांनी घ्यावी व या काळात वीज पुरवठा खंडित होणार नाही याची काळजी घ्यावी या आशयाचे निवेदन लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने देण्यात आले यावेळी भीमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भीमराव सरवादे लोक जनशक्ती पार्टीचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे परळी विधानसभा तालुका अध्यक्ष विशाल शेवाळे आदित्य चौरे शेख अकबर अविनाश शेवाळे महेश शेवाळे बालाजी शेवाळे ओमकार शेवाळे नको गुणवंत शेवाळे चंद्रसेन शेवाळे निखिल शेवाळे इत्यादी उपस्थित होते.

# घरकुल ऑनलाईन सर्व्हेसाठी मुदतवाढ द्या : सुजीत शिंदे

नेकनूर । प्रतिनिधी
प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गरजू नागरिकांना घरकुलांचा लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या मार्फत–किंवा स्वतःच्या माध्यमातून सर्वे करण्याचे काम सुरू असून बीड जिल्ह्यातील अनेक गावामध्ये सध्या शासनाकडुन प्रत्येकाला हक्काचे घर मिळणार आहे. तसे शासनाकडुन लाभार्थ्यांना सेल्फ सर्व्हे करण्यास शासनाने अप उपलब्ध करुन दिले आहे. परंतू लाभार्थी हे सेल्फ सर्व्हे करतांना सदरील अप मध्ये माहिती साठविताना दिरंगाई होत आहे. हा



सर्वे करताना अनेक अडथळे निर्माण होत आहे. त्यामुळे सेल्फ सर्व्हे जिकीरीचे जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लाभार्थी नागरिक हताश होत आहेत. या सर्वेची अंतिम तारीख ३० एप्रिल पर्यंत दिली आहे, परंतु अद्यापपर्यंत अनेक लाभार्थी नागरिकांचे ऑनलाईन सेल्फ सर्वे झालेला नाही. ह्या सर्वे पासून अनेक नागरिक वंचित राहतील तरी शासनाने या सर्वेला मुदतवाढ द्यावी अशी मागणी युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजीत शिंदे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# कांद्याचा भाव जास्तीत जास्त ५००० असावा आणि कमीत कमी ३५०० तरी असावा

## शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर

शिरूर का. । प्रतिनिधी
सध्या बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यात उन्हाळी लाल कांद्याची काढणी जोमात सुरू आहे मात्र यावर्षी कांदा उत्पादक शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे एकीकडे कांदा उत्पादनाचा खर्च प्रचंड वाढला आहे तरी दुसरीकडे बाजारात दरात मोठी घसरण झाल्याने शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे त्यामुळे अनेक शेतकरी कांदा तातडीने न विकता साठवूनिकीकडे वळले आहेत कांदा काढणीचा खर्च गगनाला भिडला आहे शिरूर तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार सध्या एक एकर कांदा काढण्यासाठी १५ ते २० हजार रुपयांपर्यंत खर्च येत आहे यामध्ये मजुरी वाहतूक साठवणूक पिण्याचे पाणी सरबतची व्यवस्था तसेच कांद्याची पात कापण्याचा समावेश आहे विशेष म्हणजे मजुरांची टंचाई असल्यामुळे मजुराचे दर हे प्रचंड वाढले आहेत वेळेवर मजूर मिळण्यासाठी शेतकऱ्यांना अधिक पैसे खर्च करावे लागत आहेत त्यातच गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे कांद्याच्या साठवणुकीवर धोका निर्माण झाला असून हवामान खात्याने पुन्हा पावसाचा इशारा दिल्यामुळे शेतकऱ्यांनी कांदा काढणीचा वेग वाढवला आहे कांदा भिजल्यास त्याचा रंग आणि टिकवणे यावर परिणाम होतो त्यामुळे शेतकरी कांदा वेळेत काढून त्याची पात कापून पोळ तयार करत आहेत आणि पात लावून त्याला उन्हापासून संरक्षण देत आहेत कांद्याची लागवड खते बियाणे फवारणी आणि काडणीसह एक एकरामागे २५ ते ३० हजार रुपयापर्यंत





खर्च येतो आहे परंतु सध्या बाजारात कांद्याला क्विंटलमागे केवळ १००० ते १२०० रुपयेच दर मिळतो काही आठवड्यापूर्वी कांद्याला २२०० ते २८०० रुपये दर मिळत होता त्याच्या तुलनेत सध्याचे दर शेतकऱ्यांच्या नुकसानीचे ठरत आहेत काही परिस्थिती लक्षात घेता अनेक शेतकरी कांदा विकण्याऐवजी चाळीत साठवून ठेवत आहेत जर या सरकार माय बापाने येत्या दोन दिवसात कांदा दरवाढीवर विशेष बैठक लावून कांद्याला भाव जास्तीत जास्त ५०० हजार क्विंटल व कमीत कमी ३५०० तरी भाव देवा तेव्हा कुठे शेतकरी बांधव वाचतील अन्यथा शेतकरी बांधवावर हा कांद्याला झालेला खर्च हे त्यांच्या डोक्यावर कायम कर्ज म्हणून राहतं कारण कांद्याला भाव नसल्यामुळे खर्च खूप वाढले आहेत दर कमी झाल्यामुळे शेतकरी बांधवांना हे दर परवडणारे नाहीत तरी सरकारने यावर विचार करून तोडगा काढून शेतकरी बांधवांच्या कांद्याला तात्काळ भाव देण्याचं काम करा अन्यथा शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने शिरूर कासार शहरात तील जिजामाता चौक येथून सर्व शेतकरी बांधवांना घेऊन तीव्र स्वरूपाचा मोर्चा तहसील वर काढण्यात येईल याची नोंद घ्यावी शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर
सरकारने उपयोजना कराव्यात
कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार सध्याच्या दराने आम्हाला खर्चही भरून निघत नाही एकरी २७००० हजार रुपयांचा खर्च वसूल करायचा असेल तर कांद्याला किमान २५०० ते ३००० रुपये प्रति क्विंटल दर मिळायला हवा अन्यथा शेत करणे परवडत नाही कांद्याच्या दरात रोज घसरण होत असून शेतकऱ्यांना त्याचा कष्टाचा योग्य मोबदला मिळत नाही त्यामुळे शिवसेनेच्या मागणीकडे सरकारने तातडीने पावले उचलावीत हमीभावाची अंमलबजावणी करावी आणि शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी जोरदार मागणी शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांच्याद्वारे केली जात आहे
कांदा लागवडीपासून ते काढणीपर्यंत एकरी जवळपास २५ ते ३० हजार रुपये खर्च येतो मजुरांची मजुरी ही दिवसेंदिवस वाढते आहे अशा वेळी कांद्याला २५०० ते ३००० हाजार रुपये मिळायला हवा पण सध्या फक्त १००० ते १२०० रुपये मिळतो आहे त्यामुळे साठवणी हा पर्याय आम्हाला निवडावा लागत आहे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT